# प्रेस नोट

## महिलाचे गळयातील मंगळसुत्र व चेन चोरी करणारे सराईत गुन्हेगार गुन्हे शाखा, युनिट २ कडुन जेरबंद

माननीय पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी महिलाची सुरक्षा तसेच महिलावरील अत्याचाराचे गुन्हे होणार नाहीत याकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याबाबत व महिलाचे गळयातील मंगळसुत्र व चेन चोरी करणारे आरोपींना लवकरात लवकर जेरबंद करण्याचे आदेश दिले होते. त्याअन्वये मा. प्रदीप देशपांडे अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. पंकज डहाणे पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सुरेश भोसले सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १, यांनी मंगळसुत्र व चेन चोरी करणारे आरोपींचा शोध घेवुन त्यांना जेरबंद करण्याबाबत गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांना सक्त सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे युनिट २ चे प्रभारी सतिश निकम, पोलीस निरीक्षक व त्याचे सहकारी यांनी पुणे शहरात दाखल असलेल्या चेन चोरीच्या गुन्हयाचा फेरआढावा घेत असताना अलंकार पो.स्टे. गुरनं. १८६/२०१६ मधील फिर्यादी सौ सुवर्णा दिलीप गोळे वय ४८ रा. फ्लॅट नंबर १ एमएसईबी कॉर्टर पश्चिमनगरी, कोथरुड पुणे यांचेशी आरोपीबाबत माहिती घेत असताना त्याने सांगितलेल्या वर्णनानुसार अटकेत असलेला आरोपी नामे इम्रान फिरोज इराणी, वय २८, रा. लोणी काळभोर पुणे याचेशी वर्णन मिळते जुळते असल्याने सदर आरोपीस अलंकार पो.स्टे.चे गुन्हयामध्ये वर्ग करुन अटक करुन त्याचेकडे तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा कबुल करुन इतर ४ ठिकाणी महिला व पुरुष यांचे गळयातील चेन व मंगळसूत्र चोरी केल्याचे कबूली देवून ज्याठिकाणी चेन चोरी व मंगळसूत्र चोरी केलेली आहे ते ठिकाण दाखवले त्याप्रमाणे सदर बाबत अलंकार पो.स्टे.-२, वारजे माळवाडी पो.स्टे.- १, वाकड पो.स्टे.- १, भारती विदयापीठ पो.स्टे.- अशा ५ ठिकाणी चैन व मंगळसुत्र चोरीबाबत या पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल असल्याचे निदर्शनास आले.

सदर अटक आरोपी याचेकडे सखोल चौकशी करुन चोरी केलेल्या गुन्हयाबाबत व मुददेमालाबाबत चौकशी केली असता त्याने लोणीकाळभोर व श्रीरामपूर येथील ओळखचे लोकांकडून उसने पैसे घेवून त्याबदल्यात सदरचे दागिने गहाण ठेवल्याचे सांगितल्याने सदर ठिकाणी जावून संबंधीत व्यक्तींकडून **एकूण १३३ ग्रॅम** त्यामध्ये ४ मंगळसूत्र व १ चेन असा **एकूण ०३ लाख ०१ हजार किमतीचे** सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आलेले आहेत.

**अशा प्रकारे सराईत गुन्हेगार नामे इम्रान फिरोज इराणी याचेकडून महिलांचे गळयातील मंगळसुत्र व चेन चोरीचे एकुण ०५ गुन्हे उघड करण्यात गुन्हे शाखा युनिट २ यांना यश आले आहे.**

सदरची कामगिरी ही अपर पोलीस आयुक्त, गुन्हे मा. प्रदीप देशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, मा. पंकज डहाणे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे १, मा. सुरेश भोसले, यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सतिश निकम, कर्मचारी उदय मोरे, राजू केदारी, दिनेश गडांकुश, अजीनाथ काळे, अतुल गायकवाड, रेवणसिध्दा नरुटे, अजित फरांदे, प्रसाद जंगीलवाड, चंद्रकांत महाजन, यांनी केलेली आहे.